## समग्र शिक्षा अंतर्गत योजना

| अ.क्र. | योजनेचे नाव | निकष | उद्दिष्ट |
|---|---|---|---|
| १. | मोफत गणवेश वाटप | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इ. १ ली ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी २ गणवेश संच पुरविण्यात आले. | १. ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देणे.<br>२. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के पटनोंदणी करणे.<br>३. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के उपस्थिती टिकवणे.<br>४. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे. |
| २. | मोफत गणवेश वाटप (एक जोडी बुट व दोन जोडी पायजामे) | सन २०२४-२५ पासून इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजे करिता प्रति विद्यार्थी रु.१७०/- प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले. | १. ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देणे.<br>२. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के पटनोंदणी करणे.<br>३. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के उपस्थिती टिकवणे.<br>४. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे. |
| ३. | संयुक्त शाळा अनुदान (प्राथमिक) | संयुक्त शाळा अनुदान हे सर्वात वरचा वर्ग इयत्ता 8 वी चा असणा-या स्थानिक स्वराज्य प्राथमिक शाळांना शाळेच्या पटसंख्येच्या निकषानुसार तत्त्वतः मंजूर करण्यात आले आहे. संयुक्त शाळा अनुदान हे जिल्हापरिषद, नगरपालिका /नगरपरिषद / महानगरपालिका, कटक मंडळे इ. साठी मंजूर आहेत. | १. शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्मितीस प्रोत्साहन देणे.<br>२. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे.<br>३. सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना भौतिक सुविधा निर्माण करणे. |
| ४. | संयुक्त शाळा अनुदान (माध्य.) | संयुक्त शाळा अनुदान हे सर्वात वरचा वर्ग १० वी किंवा १२ वी पर्यतचे वर्ग असलेल्या एकूण ७ माध्यमिक शाळांना शाळेच्या पटसंख्येच्या निकषानुसार | १. शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्मितीस प्रोत्साहन देणे.<br>२. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तत्वतः मंजूर करण्यात आले आहे. सदर अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागाकडून चालविलेल्या आश्रमशाळा, समाजकल्याण विभागाकडून चालविलेल्या शाळा, विदयानिकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा (जिल्हा परिषद, नगरपालिका) संयुक्त शाळा अनुदान हे शासकीय माध्यमिक शाळांसाठी तरतूद मंजूर आहे. | देणे.<br>३. सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना भौतिक सुविधा निर्माण करणे. |
| ५. | मोफत पाठ्यपुस्तक वाटप | शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका व खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील इ. । ली ते 8 वी मधील सर्व मुला-मुलींना पाठ्यपुस्तके वितरीत केली जातात. | ५. ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देणे.<br>६. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के पटनोंदणी करणे.<br>७. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील मुलांची १०० टक्के उपस्थिती टिकवणे.<br>८. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे. |
| ६. | दिव्यांग समावेशित शिक्षण योजना | समग्र शिक्षा दिव्यांग समावेशित शिक्षण योजनेकरिता प्रत्येक मुलांसाठी रुपये 3500/- प्रती वर्षी तरतूद केली जाते. याउपक्रमांतर्गत वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येवून त्याचे जिल्हा व तालुकास्तरावर अंमलबजावणी करण्यात येते. | दिव्यांग व शाळाबाहय मुलांना नियमित शाळेच्या प्रवाहात आणणे. |
| ७. | विदयार्थी वाहतूक भत्ता अनुदान | बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम भाग 3 कलम 6 (3) (1) नुसार नजिकच्या शाळेच्या क्षेत्रामध्ये किंवा हदीच्या आत शाळा उपलब्ध नाहीत अशा वस्त्यामधील 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन सूविधा किंवा अन्य सूविधा उपलब्ध करून देण्यात येईल अशी तरतूद आहे. | 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देणे. |